# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.07.2025** **वारःबुधवार**

1. भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांच्यासह त्यांचे तीन सहकारी सुखरूप पृथ्वीवर दाखल; देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव
2. गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांची शिक्षा आणि दंडाची रक्कम वाढवण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन
3. गणेशोत्सवासाठी राज्य परिवहन महामंडळ पाच हजार अतिरिक्त गाड्या सोडणार आणि
4. राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर वाढला; आजही अनेक ठिकाणी पावसाचा अंदाज

**शुभांशू शुक्ला**

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ॲक्सिओम फोर मोहिमेतले त्यांचे तीन सहकारी काल सुखरूप पृथ्वीवर परतले. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून त्यांना घेऊन निघालेलं स्पेस एक्सचं ड्रॅगन अंतराळ यान कॅलिफोर्नियात पॅसिफिक महासागरात उतरलं. हे अंतराळवीर आता पृथ्वीवरच्या वातावरणाशी जुळवून घेण्याकरता 7 दिवस विलगीकरणात राहणार आहेत. 18 दिवसांच्या अंतराळ मुक्कामात शुक्ला यांनी भारतासाठी 7 वेगवेगळे प्रयोग केले आहेत.

ॲक्सिओम फोर मोहीम यशस्वीपणे पूर्ण करून पृथ्वीवर परतल्यानंतर काल देशभरातून शुभांशू शुक्ला यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ग्रुप कॅप्टन शुक्ला यांचं समाज माध्यमावरुन अभिनंदन केलं. ही मोहीम भारताच्या अंतराळ क्षेत्रातील प्रगतीतील मैलाचा दगड ठरली आहे असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शुक्ला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचं स्वागत केलं; शुक्ला यांची कामगिरी देशाच्या गगनयान मोहिमेतील पुढचं पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. अंतराळ स्थानकात गेलेल्या भारताच्या सुपुत्राचं पृथ्वीवर यशस्वी पुनरागमन ही अभूतपूर्व घटना असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. ग्रुप कॅप्टन शुक्ला पुनर्वसन कार्यक्रमानंतर 17 ऑगस्टच्या सुमारास मायदेशी परतण्याची शक्यता असल्याचं त्यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. यावेळी बोलताना ते म्हणाले....

**भारत मां का एक पुत्र आज कामयाबी से लौटा है। एक ऐसे प्रयोग से एक ऐसी यात्रा से जिसमें बहुत सारे ऐसे एक्सपेरिमेंट्स किए गए जो पहले कभी न किये गए थे लेकिन जिनका समस्त मानव जाति के लिए महत्व रहेगा। आज वास्तव में विश्वबंधु के रूप में शुभाषांशु ने हमारी तर्जुबानी करते हुए वो काम वहां अंजाम दिया है और ये कह सकते हैं कि अंतरिक्ष में एक स्थायी स्थान भारत को आज स्थापित करने का अवसर भी रहा। सफलता भी रही।**

शुभांशू शुक्ला सुखरूप पृथ्वीवर परतल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी लखनौ इथं आनंदोत्सव साजरा केला. देशभरात अनेक ठिकाणी या घटनेबद्दल जल्लोष करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही समाज माध्यमावर शुभेच्छा संदेश दिले. ॲक्सिओम-4 या यशस्वी मोहिमेमुळे भारतीयांचा अवकाश संशोधन क्षेत्रातला आत्मविश्वास दुणावला असून भारतीय तरुणांसाठी ही मोहीम प्रेरणादायी ठरणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**विधिमंडळ**

मोठ्या परताव्याचं आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधातली शिक्षा आणि दंडाची रक्कम वाढवली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत सांगितलं. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित आरोपी कंपनीची मालमत्ता शोधणं, त्यांचं मूल्यांकन करून खटल्याचा जलद निपटारा करण्यात पोलिसांना मदत करण्यासाठी राज्य सरकार विशेष व्यवस्था निर्माण करेल, असंही ते म्हणाले.

राज्यातली प्रधानमंत्री आवास योजनेची प्रतीक्षा यादी संपली आहे अशी माहिती फडणवीस यांनी दिली. यावर्षी केंद्र सरकारनं देशात सर्वाधिक 30 लाख घरं महाराष्ट्राला मंजूर केली असून त्यातल्या 20 लाख घरांसाठी निधी दिला आहे, असे ते म्हणाले.

अनधिकृत कत्तलखाने असताच कामा नये, अशी शासनाची भूमिका आहे; अशा कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना देऊ, असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी काल विधानपरिषदेत दिलं. भविष्यात महानगरपालिकेच्या अधिकृत कत्तलखान्यातच कत्तल करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

**कोकाटे**

देशातील अनेक राज्यांमध्ये एक रुपयांत पीक विमा योजनेत गैरव्यवहार झाल्यामुळे राज्यातही ही पीक विमा योजना बंद आहे; आता नवीन पीक विमा योजने अंतर्गत राज्यात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात आहे अशी माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल विधान परिषदेत दिली. ते म्हणाले....

**नवीन पीक विमा योजना लागू केली आहे. आणि अशा प्रकारची पीक विमा योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आता या ठिकाणी आम्ही देतोय. फार कमी रकमेमध्ये म्हणजे दोन टक्के खरिपामध्ये दीड टक्के रब्बीमध्ये आणि नगदी पिकामध्ये आपण पाच टक्क्यापर्यंत या ठिकाणी आकारणी करतोय पीक विम्याची. आणि त्या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना वेळेवर आणि उत्कृष्टपणे विमा योजना सुटसुटीत राहील असा विचार राज्य शासनाने केलेला आहे. आणि उर्वरित रक्कम ही भांडवली खर्चासाठी आम्ही गुंतवणार आहोत.**

**टेस्ला शोरूम उद्घाटन**

महाराष्ट्र देशातले सर्वात मोठे इलेक्ट्रिक वाहन उत्पादन क्षमता असलेले राज्य ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते काल मुंबईत टेस्ला या जगप्रसिद्ध इलेक्ट्रिक कार निर्मात्या कंपनीच्या एक्सपीरियन्स सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. जगातील सर्वात स्मार्ट कार भारतात येत आहे

आणि त्याची सुरुवात मुंबईतून होत आहे ही महाराष्ट्रासाठी आणि विशेषतः मुंबईसाठी आनंदाची गोष्ट आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. राज्य शासनाने इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी अत्यंत गतिमान धोरण राबवले असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>गणपतीसाठी जादा गाड्या</u>**

आगामी गणेश उत्सवासाठी एसटी महामंडळाने यंदा 23 ऑगस्ट ते 7 सप्टेंबर दरम्यान 5 हजार अतिरिक्त गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या गाड्यांच्या आरक्षणासाठीची सुविधा एसटीच्या अधिकृत संकेतस्थळावर तसंच बसस्थानकावर किंवा महामंडळाच्या ॲपद्वारे उपलब्ध होणार आहे. गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत होण्यासाठी बसस्थानक आणि बसथांब्यावर कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार असून कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथक देखील तैनात करण्यात येणार असल्याचं सरनाईक यांनी सांगितलं.

**<u>प्रदेशाध्यक्ष-मुंबई</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून विधान परिषदेचे आमदार शशिकांत शिंदे यांची काल निवड करण्यात आली. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड यांच्यासह इतर महत्त्वाच्या नेत्यांची मुंबईत बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. अनिल देशमुख यांनी शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला आणि त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शरद पवार आणि जयंत पाटील यांनी शिंदे यांचं अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<u>एक जिल्हा, एक उत्पादन</u>**

'एक जिल्हा एक उत्पादन 2024' अंतर्गत महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली असून राज्याला 'अ' श्रेणीतील सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. रत्नागिरी जिल्ह्याला हापूस आंब्यासाठी कृषी क्षेत्रातील 'अ' श्रेणीअंतर्गत प्रथम स्थान मिळालं आहे. नागपूरच्या संत्र्यांनी द्वितीय स्थान, अमरावती जिल्ह्याने मंदारिन संत्र्यांसाठी तृतीय स्थान प्राप्त केले तर नाशिक जिल्ह्याने द्राक्षं आणि मनुक्यांसाठी विशेष उल्लेख पुरस्कार मिळवला. अकोला जिल्ह्याने गैर-कृषी क्षेत्रातील श्रेणीतील 'ब' श्रेणी अंतर्गत कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी विशेष उल्लेख पुरस्कार प्राप्त केला आहे.

**<u>प्राडा-कोल्हापुरी चपला-कोल्हापूर</u>**

इटलीतील मिलान इथं काही दिवसांपुर्वी झालेल्या एका फॅशन शोमध्ये प्राडा या फॅशन ब्रँडनं कोल्हापूरी चप्पलेला ओपन टी लेदर सँडल असे संबोधित केले होते. या विधानावर कोल्हापूरातील माध्यमे, कारागिरी यांच्यासह देशातील फॅशन तज्ज्ञ, चित्रपट क्षेत्रातील कलाकार आणि काही राजकीय नेत्यांनी टीका केली होती. यासंदर्भात, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सने प्राडाशी पत्रव्यवहार केल्यानंतर; प्राडाने ती कोल्हापूरी चप्पलच असल्याचं मान्य केलं.

**<u>निधन-दीपक टिळक</u>**

लोकमान्य टिळक यांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पावणेचारच्या सुमारास पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. ते 72 वर्षांचे

होते. त्यांचे पार्थिव सकाळी आठ ते 11 या वेळेत नारायण पेठेतील केसरी वाड्यात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**राज्य पाऊस**

राज्याच्या विविध भागात काल जोरदार पाऊस पडला. **रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोर धरला असून खेडमधली जगबुडी, संगमेश्वरमधली शास्त्री आणि राजापुरातली कोदवली या तीन नद्या इशारा पातळीच्या वरून वाहत आहेत. खेड तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटात काल दरड कोसळली.

**सिंधुदुर्ग** जिल्ह्यातही दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून जिल्ह्यातल्या सर्वच नद्या दुथडी भरून वाहत आहेत. सावंतवाडी तालुक्यात आंबेगाव इथं पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानं एका तरुणाचा मृत्यू झाला.

**रायगड** जिल्ह्यातही आंबा, कुंडलिका आणि सावित्री नदीने धोका पातळी ओलांडल्याने नागोठणे, रोहा आणि महाड परिसरात पुरपरिस्थिती आहे. काही ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनाही घडल्या. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने किल्ले रायगडावर जाणारा पायरी मार्ग 15 ऑगस्ट पर्यंत बंद केला आहे.

**पुणे** आणि परिसरातही काल सकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. **नाशिक** जिल्ह्यातील गंगापूर धारण समूहातील सहा धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. सातारा जिल्ह्यातील कोयना धरणातून कालपासून विसर्ग सुरू आहे, तर **सांगली**तील वारणा धरणातून होणारा विसर्ग वाढविण्यात आल्यानं वारणा नदीच्या पाणी पातळीत वाढ होणार आहे. त्यामुळं नदीकाठच्या लोकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**कोल्हापूरा**तही गेले दोन दिवस पावसानं जोर धरला असून, काल दिवसभर झालेल्या मुसळधार पावसान हजेरी लावली. त्यामुळं पंचगंगा नदीची पाणी पातळी आठ फुटानं वाढली असून, जिल्हयातील 32 बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात बऱ्याच ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार